# Vidyawarta®

Peer Reviewed International Refereed Research Journal

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed Pin-431126 (Maharashtra)

## Certificate Of Publication

This is to certify that the review board of our research journal accepted the research paper/article titled खर्डा या पर्यटन स्थळाचा भौगोलिक अभ्यास of

Dr./Mr./~~Miss~~/~~Mrs~~. Shivanand Tanajirao Jadhav

It is peer reviewed and published in the Issue 33 Vol. 11 in the month of Jan - March 2020 .

Thank you for sending your valuable writing for Vidyawarta Journal

Indexed (IIJIF)

Impact Factor 7.041

Govt.of India, Trade Marks Registry Regd.No.2611690

ISSN-2319 9318

Editor in chief
Dr.Bapu G.Gholap


Scanned by CamScanner

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

**Issue-33, Vol-11 January to March 2020**




Editor
Dr.Bapu G.Gholap

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
International Multilingual Research Journal

www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

https://www.ugc.ac.in/pdfnews/4033931_UGC-Regulation_min_Qualification_Jul2018.pdf

**Table 2**

**Methodology for University and College Teachers for calculating Academic/Research Score**

(Assessment must be based on evidence produced by the teacher such as: copy of publications, project sanction letter, utilization and completion certificates issued by the University and acknowledgements for patent filing and approval letters, students' Ph.D. award letter, etc,.)

| S.N. | Academic/Research Activity | Faculty of Sciences /Engineering / Agriculture / Medical /Veterinary Sciences | Faculty of Languages / Humanities / Arts / Social Sciences / Library /Education / Physical Education / Commerce / Management & other related disciplines |
|---|---|---|---|
| 1. | **Research Papers in Peer-Reviewed or UGC listed Journals** | 08 per paper | 10 per paper |
| 2. | **Publications (other than Research papers)** | | |
| | **(a) Books authored which are published by ;** | | |
| | International publishers | 12 | 12 |
| | National Publishers | 10 | 10 |
| | Chapter in Edited Book | 05 | 05 |
| | Editor of Book by International Publisher | 10 | 10 |
| | Editor of Book by National Publisher | 08 | 08 |
| | | | |
| | | | |
| | **(b) Translation works in Indian and Foreign Languages by qualified faculties** | | |
| | Chapter or Research paper | 03 | 03 |
| | Book | 08 | 08 |
| 3. | **Creation of ICT mediated Teaching Learning pedagogy and content and development of new and innovative courses and curricula** | | |
| | **(a) Development of Innovative pedagogy** | 05 | 05 |
| | **(b) Design of new curricula and courses** | 02 per curricula/course | 02 per curricula/course |
| | **(c) MOOCs** | | |
| | Development of complete MOOCs in 4 quadrants (4 credit course)(In case of MOOCs of lesser credits 05 marks/credit) | 20 | 20 |
| | MOOCs (developed in 4 quadrant) per module/lecture | 05 | 05 |
| | Content writer/subject matter expert for each module of MOOCs (at least one quadrant) | 02 | 02 |
| | Course Coordinator for MOOCs (4 credit course)(In case of MOOCs of lesser credits 02 marks/credit) | 08 | 08 |
| | **(d) E-Content** | | |
| | Development of e-Content in 4 quadrants for a complete course/e-book | 12 | 12 |
| | e-Content (developed in 4 quadrants) per module | 05 | 05 |
| | Contribution to development of e-content module in complete course/paper/e-book (at least one quadrant) | 02 | 02 |
| | Editor of e-content for complete course/ paper /e-book | 10 | 10 |
| 4 | **(a) Research guidance** | | |

Scanned by CamScanner

14) Gender Inequality in India - Problem And Solutions
**Dr. K. B. Ojha, Hanumangarh** ||66

15) Economic Impowerment Of Trial Women's Through Self Help Group ...
**Purnima Kumari, Bihar** ||70

16) Technology and changing cropping pattern in Satara District...
**Dr. B. R. Shinde, Osmanabad** ||76

17) An Overview Of Vat & Gst : It's Incidence & Relevance With Special...
**Miss. Shobha Sarita Bhuinyan, Dr. M. P Srivastava** ||79

18) Global Hunger Index Report 2019: Ground Reality In Global Food Security...
**Dr. Rupali Srivastava, Jodhpur, Dr. Anuradha Sharma, Agra** ||84

19) The Impact of ICTs In Library & Information services at Central library...
**Reena Singh Tomar, Agra** ||89

20) Ranking System For Higher Education : Status And Challenges...
**Avtar jitsingh, Yogita Kamal, Indore** ||94

21) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील जव्हार तालुक्याचे योगदान आणि संस्थानाचे ...
**डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी, जि. ठाणे** ||100

22) जागतिकीकरण आणि पर्यावरण
**डॉ. वर्षा गंगणे, जि. गोंदिया** ||103

23) हिंदुस्थानी संगीतातील ठुमरी या गीत प्रकाराचा उगम व इतिहास
**डॉ. एन. एल. गोंडाणे, अकोला** ||107

24) खर्डा या पर्यटन स्थळाचा भौगोलिक अभ्यास
**प्रा. डॉ. शिवानंद तानाजीराव जाधव, खर्डा** ||109

25) भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रवास — स्वर ते राग
**प्रशांत राजवर्धन, मुंबई** ||113

26) स्वाभिमानी सम्पादक शोईब के समर्पण की सच्चाई—शहादत
**डॉ. देविदास भिमराव जाधव, जि. नांदेड** ||117

27) प्रेमचंद के उपन्यासों में गाँवों एवं शहरों के बीच आर्थिक रिश्ते
**डॉ. अरुण घोगरे, जि. अमरावती (महा.)** ||119

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned by CamScanner

डॉ. सुशिल चौबे यांचे मतानूसार लखनौ चे उस्ताद सादिक अली खॉं यांना ठूमरीचे निर्माते मानतात. परंतू ठूमरी हा गीत प्रकार यांच्या कार्याकाळाच्या पूर्वीच प्रचारात होता. कॅप्टन एन. ऑगस्टस विलर्ड ह्यांनी आपल्या ग्रंथात १८३४ मध्ये ठूमरीची चर्चा केली होती.

श्रीयूत कृष्णधन बॅनर्जी ने श्री क्षेत्र मोहन गोसामी यांच्या संगीत सार या ग्रंथात मीयॉंशौरी ह्यांना ठूमरीचा निर्माता मानतात. परंतू शौरी हे टप्पा गीत प्रकाराचे जनक होते. व ठुमरी हा गितप्रकार टप्पागीत प्रकाराच्या एकदम वेगळा असल्यामुळे ते ही जनक होते शक्य नाही. १७७५ ते १७९७ लखनौ १७९७ ते १८०३ च्या आत जयपूर महाराजा सवाई प्रतापसींह यांच्या काळात ठूमरीबाबत चर्चा आहे. मोहम्मद शहा रंगीले १६१९ ते १६४९ मध्ये ठूमरीची उल्लेख आढळतो व नियॉमत खॉं सदारंग यांचा कार्यकाळ व याने दिलेली ठूमरी पृ. क्र. ५५ तसेच १६७५ मध्ये देखील ठूमरीचा उल्लेख आहे. पृ. क्र. ५८.

**निष्कर्ष :—**

भारतात संगीत हे इश्वर उपासना व लोकरंजनाचे माध्यम होते. मानवाच्या जन्मापासूनच संगीत हे सोबत आलेले आहे. अगदी प्राचिन काळापासून मनुष्य हा संगीताचा भक्त आहे. तो संगीत प्रेमी आहे. मुळात मनुष्यप्राणी हा प्रयत्नशील आहे. नविन नविन काही करण्यातच तो स्वत:ला धन्य समजतो. संगीताचा इतिहास हा प्राचिन आहे. संगीतामध्ये अनेक गितप्रकार हे परंपरेने चालत आलेले आहे. त्यातील काही गीत प्रकार कोणी निर्मान केलेत ह्या बाबत मतांचा थोडाफार फरक पडत आलेला आहे. ठूमरी ह्या गीत प्रकाराच्या निर्मिती बाबत अनेक मतमतांतरे आपणास दिसून आलेली आहे. परंतू हा गितप्रकार पूर्वी पासूनच कमी जास्त प्रमाणात प्रचारात होता. व त्याचा परंपरेने व काळाच्या ओघात प्रचार व प्रसार झालेला आहे. हे प्रामुख्याने म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ —**

१) ठूमरी की उत्पत्ती, विकास और शैलियॉं लेखक — शत्रूघ्न शुक्ल
२) संगीत विशारद — वसंत हाथरस प्रकाशन
३) संगीत निबंधावली — हाथरस प्रकाशन

**24**

# खर्डा या पर्यटन स्थळाचा भौगोलिक अभ्यास

**प्रा. डॉ. शिवानंद तानाजीराव जाधव**
सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख, भूगोल विभाग,
श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा

**********

**सारांश:** बालाघाट पर्वत रांगेच्या कुशीतवसलेले खर्डा हे कसबा असलेले ऐतिहासिक शहर व आजचे मोठेगाव (ग्रामपंचायती) असून गावामध्ये कापड, भांडी, सोने, अवजारे, कृषी उपयोगी सेवा सुविधा बरोबरच व्यापार मोठ्या प्रमाणात विकसित झालेला आहे. हे गाव शिर्डी—हैद्राबादमहामार्गावर असल्याने व आजूबाजूचा दऱ्या—डोंगरांचा प्रदेश असल्या कारणाने अवती—भवती असलेल्या वाडया—वस्त्या व गावाचे मुख्य बाजारपेठेचे केंद्र आहे. गावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी बरोबरच गावाच्या अवती—भवती असलेल्या अनेक आकर्षित केंद्रामुळे या गावाला पर्यटनस्थळ म्हणून ओळख निर्माण झालेली असून महाराष्ट्र शासनाने या पर्यटन स्थळाचा समावेश 'क' दर्जाच्या पर्यटन स्थळात केलेला आहे. गावाभवती असलेल्या पर्यटन स्थळांचा योग्य नियोजन पूर्वक विकास केला गेला तर भविष्यात या ठिकाणी पर्यटनाबरोबरच सेवा—सुविधांचा विकास होऊन स्थानिक लोकांना रोजगार प्राप्त होऊन आर्थिक विकासाबरोबरच ग्रामीण विकास साधता येईल.

**बिजसंज्ञा:** रणटेकडी, छत्री, गड, शिवमंदिर

**प्रस्तावना:** अहमदनगर जिल्ह्यात दक्षिणेस पूर्वभागात ऐतिहासिक खर्डा हे शहर वसलेले असून या भागातील निजामकालीन भुईकोट किल्ला, अनेक ऐतिहासिक मंदिरे, समाध्या यामुळे या प्रदेशाचा क दर्जाच्या पर्यटन स्थळामध्ये समावेश झालेला असून हे केंद्र पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनत चाललेले आहे. हैद्राबाद—शिर्डीमहामार्गावरूनव पैठण—पंढरपूर पालखी मार्गावरून



Scanned by CamScanner

जाणाऱ्या असंख्य पर्यटकांना या पर्यटन स्थळांची सविस्तर माहिती मिळाल्यास निच्छितच पर्यटकांच्या संख्येत वाढ होऊन या प्रदेशामध्ये रोजगाराच्या संधी वाढून आर्थिक विकास होण्यास मदत होईल.

**अभ्यासक्षेत्र** : खर्डा हे पुरातन शहर व सध्य कालीन गाव अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिणेस जामखेड तालुक्यात उस्मानाबाद– बीड जिल्ह्याच्या सीमे जवळ कौतुका नदीच्या डाव्या तीरावर अक्षवृत्तावर व रेखावृत्तावर वसलेले असूनगावाचे एकुण क्षेत्रफळ घिंघं हेक्टर आहे. भौगोलिक दृष्टयत हा भूप्रदेशबालाघाटाच्या पर्वतीय प्रदेशात आठळतो. गावाच्या पूर्व भागात नागोबाचीवाडी,मुंगेवाडी, पश्चिमेस वाकी, लोणी, बाळगव्हाण, आनंदवाडी दक्षीणेस सातेफळ तर उत्तरेस गवळवाडी, गीतेवाडी पांढरेवाडीसह अनेक लहान लहान विखुरलेल्या वस्त्या आहेत गावाच्या उत्तरेस १.५ की. मी. अंतरावर उस्मानाबाद जिल्ह्याची तर पूर्वेस १५ की. मी. अंतरावर जातेगाव जवळ बीड जिल्ह्याची सीमा लाभते.

बालाघाटाच्या प्रदेशाचा भूभाग असल्याने हा प्रदेश पर्जन्यछायेच्या प्रदेशात मोडत असल्याने कमी पर्जन्य व उष्ण हवामान हे या प्रदेशाचे वैशिष्ठ आहे त्यामुळे या प्रदेशात कृषी विकासाचा अभाव असल्याने आर्थिक विकासाचे साधन म्हणून पर्यटन विकासास वाव आहे. कारण गावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे व गावाच्या सभोवताली अनेक ऐतिहासिक, धार्मिक ठिकाणे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाची आहेत.

**संशोधनाचे उद्देश्य:**

१. पर्यटकांपर्यंत पर्यटन स्थळांची माहिती पोहचविणे.

२. शाश्वत विकासाच्या दृष्टीने पर्यटन स्थळांची माहिती मिळविणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनलेखनासाठी प्राथमिक व दुय्यम माहिती स्त्रोताचा वापर करण्यात आलेला असून प्राथमिक स्वरूपात प्रत्यक्षात पर्यटन स्थळांना भेटी देवून तेथील स्थानिक नागरीकांकडून अधिकाधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न करण्यात आला. दुय्यम स्वरूपात प्रकाशित विविध पुस्तके, लेख व संदर्भ ग्रंथाचा व इनसायक्लोपेडीया/संकेतस्थळांचा वापर करण्यात आला.

**विषय विवेचन:**

छत्रपती शिवाजी महाराजाच्या पत्नी राणी सईबाई यांच्या वंशजातील व धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांचे पुत्र व सातारा संस्थानाचे छत्रपती शाहू महाराजांचे सर लष्कर सुलतानराव निंबाळकर यांनी खर्डा या गावास वैभव प्राप्त करून दिल्याने या गावाचे खर्डा शहरात रुपांतर झाले. गावाच्या तिन्ही बाजूने डोंगराळ भाग असल्याने जणू गाव खड्डयामध्ये असल्याचे जाणवत असल्याने या गावास खर्डा नाव पडले असावे असा समज होता मात्र निंबाळकरांनी या गावाच्या सभोवताली असलेल्या बारा शिवमंदिरामुळे या गावास शिवपट्टण हे नाव दिले. या ठिकाणाचा भुईकोट किल्ल्यामुळेहे व्यापारी शहर म्हणून नावा रूपाला आलेहोते मात्र इतिहास प्रसिध्द खर्डाच्या लढाई नंतर या शहरास उतरती कळा लागली असली तरी आज या ठिकाणी इतिहासाची आणि स्वाभिमानाची साक्ष देणारे अनेक ठिकाणे अस्तित्वात आहेत ज्यामध्ये भुईकोट किल्ला, निंबाळकरांची गढी,निंबाळकरांचीछत्री, प्रत्यक्षात युध्दाचे ठिकाण रणटेकडी, पुरातन जागृत देवस्थाने, ग्रामदैवत कानिफनाथ मंदिर, ताकभातेचा वाडा, आधुनिक संत गीतेबाबा व संत सितारामबाबा यांचे समाधी स्थळ या सह अनेक ठिकाणे असून ही प्रेक्षनियव पर्यटणाच्या दृष्टीने महत्वाची आहेत. या स्थळांची माहिती पर्यटकांपर्यंत पोहचविली गेल्यास पर्यटन विकासास मोठा वाव आहे.

**निंबाळरांची गढी:** धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांचे पुत्र छत्रपती शाहू महाराजांनी सरलष्कर हैबतराव रणांगणावर पराक्रम गाजवताना धारातीर्थी पडल्याने त्यांच्या शौर्याचा मान म्हणून त्यांचे पुत्र सुलतानराजांना सरलष्करी बरोबरच खर्डा हे गाव जहागीरदारी म्हणून दिल्याने कारभाराच्या दृष्टीने सुलतानराजे निंबाळकर खर्डा येथे राहण्यासाठी आले असता त्यांनी गावाच्या मध्यभागी उंच मातीचा चढाव करून अगदी भक्कम व मजबूत स्वरूपाच्या बांधकामाव्दारे निवासस्थान म्हणून गढीचे निर्मिती केले. काळाच्या ओघात दुखावलेल्या सुलतानराजेंनी निजामशाही स्वीकारली होती कालांतराने गढीत असताना सुलतानराजे याचे नातू हैबतराव मराठा



Scanned by CamScanner

साम्राज्यात सामील होणार या शंकेनी हैबतरावव त्यांच्या नऊ पुत्रांचा निजाम सरदार माणिकदंडाने चारहजार सैनिकांसह हल्ला करून ठार केल्याने गढीचे वैभव लयास जावून आज ही गढी भग्नावस्थेत आहे.हैबतराव व त्यांच्या मुलांनी शौर्य गाजवत दिलेल्या बलिदानाचे ही गढी प्रतिक असून गढीची निगा न राखल्याने गढीचे बुरुज व भिंती ढासळत आहेत त्यामुळे दुरूनच या गढीच्या वैभवाची पाहणी करणे पर्यटकांसाठी सोयीचे ठरते.

**खर्डा किल्ला:** खर्डा शहराच्या दक्षिणेससुलतानदुर्ग नावाचा भुईकोट किल्ला भौगोलिकदृष्ट्या १८०३७'५६'' उत्तर अक्षवृत्त व ७५०२८'३२'' रेखावृत्तावर समुद्रसपाटीपासून २.६० की.मी.उंचावर आहे. हा किल्ला सुलतानराजे निंबाळकर यांनी इ.स. मध्ये निजाम कालखंडात बांधलेला आहे. सर्वसाधारण तीन हेक्टर क्षेत्रात चौरसा कृती आकारातीलया किल्याची तटबंदी मातीच्या भरावापासून मजबूत स्वरूपाची बांधलेली आहे. पूर्व दिशेत मुख्य दरवाजा असून समोरील भिंतीची लांबी सर्वसाधारण १०२ मी., दक्षीण बाजूची १०७ मी. पश्चीमेकडील १०० मी. तर उत्तरेकडील १०५ मी. लांबीची आहे. सुलतानराजेंनी किल्ल्याचे सोनुसिंगबैस या सरदाराची किल्लेदार म्हणून नियुक्ती केल्याने किल्ला सुरक्षित समजला जात असे. ११ मार्च १७७५ रोजी मराठे व निजामामध्ये जवळच असलेल्या रणटेकडी येथील युध्दातूनिजाम सरदार पळून येवून किल्ह्याच्या आश्रयाला आला व युध्दात मराठ्यांचा विजय झाला. त्यानंतर मराठ्यांच्या गनिमीकाव्याच्या युद्धनीतीपुढेनिजामाने १३ मार्च १६७५ ला शरणागतीपत्करून मराठ्यांशी तस केला. इतिहासात हा मराठ्यांचा शेवटचा विजय असल्याने ११ मार्च हा शौर्य दिन म्हणून साजरा केला जातो. किल्याच्या अंतर्गत भागात सध्यस्थितीस चीरेबंधी बारव, मज्जीद व तळघर पहावयास मिळते. स्थानिक जनतेच्या वतीने किल्यावर किल्यावर तोफ बसवण्यात आलेली आहे. किल्यावर १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या राष्ट्रीय सणाच्या दिवशी स्थानिक प्रशासनाच्या वतीने शासकीय ध्वजवंदना करण्यात येते. किल्याचे सुशोभिकरण व मनोरंजनाच्या सेवा सुविधा उपलब्ध केल्यास पर्यटकांच्या संख्येत निश्चितच वाढ होईल.

**निंबाळकर छत्री:** सरलष्कर सुलतानराजे निंबाळकर यांनी तीनशे—चारशे वस्तीच्या खर्डा गावाचे रूप पालटून त्यांचे शहरात रुपांतर करत प्रसिद्ध बाजारपेठ म्हणून विकसित करताना शिवपट्टण म्हणून नामांकरण करत लोकांमध्ये भक्ती व शक्तीचा सुरेख संगम घडवून आणला. मराठा साम्राज्यामध्ये सुलतानराजे निंबाळकरांनी अनेक मोहिमा फत्ते करून साम्राज्यास बळकटी देण्याचे कार्य केलेले आहेत.मोगलांचा सरदार हुसेन अलीच्या फौजेवर असो की निजाम सरदार चंद्रसेन जाधव व मुहकमसिंह यांचा पाडाव, साखरखेड येथे पातशहाच्या फौजेचा पराभव व कर्नाटकातील मोहिमेत त्यांनी गाजवलेला पराक्रम आपणास एका शूर योध्दाचे दर्शन घडवते त्या बरोबरच त्यांनी केलेली देव, धर्माची सेवा आपणास सतत प्रेरणा दायी आहे. अशा या योध्दाची समाधी गावाच्या पूर्व भागात ओंमकारेश्वर या मंदिरा जवळ असून निंबाळकरांची छत्री म्हणून ओळखली जाते. समाधीचे चीरेबंधी बांधकाम आकर्षक असून येथे भेटी देणाऱ्या पर्यटकांना शक्ती—भक्ती च्या पायी नतमस्तक होऊन कार्यास प्रेरणा मिळते.

**श्री क्षेत्र सिताराम गड:** खर्डा व पंचक्रोशी बरोबरच उस्मानाबाद, बीड, सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यातील असंख्य गावात आधुनिक काळातील संत सिताराम बाबा उंडेगावकर यांनी पायपीट करत आपल्या प्रवचनातून, मार्गदर्शनातून लोकांमध्ये प्रबोधन करत असत. त्यांनी अनेक गावात लोकसहभागातून ३०० पेक्षा अधिक मंदिरे उभारून लोकांना अध्यात्माची गोडी निर्माण केली. बाबांनी अनेक ठिकाणी अन्नदान करून लोकांमध्ये अन्नदान श्रेष्ठदान या विचाराची रुजवणूक करत आपल्या मार्गदर्शनातून नशामुक्ती करत भक्तीभाव रुजवला. पाडुरंगाच्या भक्तीपोटी त्यांनी पांडुरंगाला सोन्याचे लॉकीट अर्पण केले होते. पायी पालखी—दिंडीच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाची पताका खांद्यावर वाहून आयुष्यभर दिन दलितांची,गरिबांची मदत केली अशा या संताचा देहांत दि. २६ ऑगस्ट, २०१४ रोजी झाला. हयातीतसिताराम बाबांनी गावाच्या उत्तरेस असलेल्या माळरानावरील श्री तुळजाभवानी व राशीनच्याजगदंबेचे जागृत पुरातन देवस्थान असलेल्या मंदिराचे जीर्णोध्दार केले होते तेथेच त्यांच्या संमतीने श्री सिताराम गडाची



Scanned by CamScanner

स्थापना झाली तेथेच त्यांच्या समाधी स्थळी भव्य मंदिर उभारण्यात आलेले आहे. दैनंदिन पूजाअर्चा, आरती नियमित होत असते. त्याबरोबरच प्रत्येक एकादशीला पंचक्रोशीतील गावागावातून अनेक दिंड्या घेऊन भक्तजन येत असतात. गुरुपोर्णिमा, विजयादशमी, महाशिवरात्री, रामनवमी, कृष्णजन्माष्ठ्मी, हनुमान जयंती, दत्त जयंती बरोबरच गुडीपाडव्याससदगुरूसिताराम बाबा जन्मोत्सव व पुण्यतिथी उत्सव निमित्त मोठ्या प्रमाणात कार्यक्रम राबवण्यात येतात अशा वेळी लाखो लोक श्री क्षेत्र सिताराम गडास भेट देत असतात.

**बारा शिवमंदिर:**

**ग्रामदैवत कानिफनाथाची टेकडी:** हिंदू—मुस्लीम ऐक्याचे प्रतिक म्हणून ग्रामदैवत कानिफनाथ टेकडीची ओळख असून टेकडीवरील मज्जीतीचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील सर्व धर्माचे लोक एकत्र येतात. प्रत्येक वर्षी रंगपंचमीच्या दिवशी टेकडीच्या पायथ्याशी कानिफनाथाची यात्रा भरते हि यात्रा खर्डाची यात्रा म्हणून प्रसिध्द आहे..

**संत गीतेबाबा समाधी:**खर्डा शहरालगत असलेल्या कानिफनाथ टेकडी जवळ वारकरी संप्रदायाचे पुरस्कर्ते या भागातील प्रसिद्ध संत गीतेबाबा यांची दुरावस्थेत समाधी आहे. संत गीतेबाबांनी खर्डा पंचक्रोशीतील दर्‍या—खोर्‍यात राहणार्‍यां लोकांना भक्तीमार्गाला लावण्याचे महत्वाचे कार्य केलेले असून गीतेबाबांनी प्रवचन—कीर्तनाच्या माध्यमातून परिसरातील लोकांना विठ्ठल भक्तीचा लळा लावला. ते लोकांना तुळशीमाळ बाळगायला सांगून नशामुक्तीसाठी मोलाचे कार्य केलेले आहेत. महाराष्ट्रातील प्रसिध्द संत भगवान बाबा यांना सुध्दा संत गीतेबाबानीतुळशीमाळघातल्याने त्यांना भगवान बाबांचे अध्यात्मिक गुरु म्हणून हि ओळखले जाते. परिसरात मोठ्या प्रमाणात गीतेबाबांनामानणारा वर्ग असून समाधी जीर्णोद्धाराचे काम मोठ्या प्रमाणात सुरुआहे त्यामुळे खर्डा पर्यटनाचे एक केंद्र म्हणून श्री संत गीतेबाबासमाधीस्थळविकसित होत आहे.

**निष्कर्ष:** खर्डा शहराभोवती असलेल्या अनेक आकर्षित केंद्राची माहिती, त्याचा इतिहास लोकांपुढे पोहचायला हवा. त्या बरोबरच योग्य व्यवस्थापन व नियोजन साधून या स्थळांचा विकास साधला गेल्यास, मनोरंजनाची, विरुंगळ्याची व्यवस्था निर्माण झाल्यास हैद्राबाद—शिर्डी प्रवास करणाऱ्यां पर्यटकांना हे पर्यटन केंद्र भुरळ घालून थांबायला भाग पाडल्यास या भागातील सेवा—सुविधा बरोबरच रोजगारामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊन आर्थिक विकासाला चालना मिळेल.

**संदर्भ:**


**1. K. Sajjan Lal** (1939): 'The Battle of Kharda and its Significance', Proceedings of the Indian History Congress, Indian History Congress, Vol.3, pp. 1340-1359.

**2. G.T. Kulkarni** (1980): Battle of Kharda, Challenges and Responses, Deccan College Postgraduate and Research Institute, Pune.

**3.** राजेंद्र एकनाथ वाकचौरे(२०१५): श्री 'संत सीताराम अवतार कार्य', प्रकाशक— राजेंद्र एकनाथ वाकचौरे, नाशिक.

4. https://fortsandtreks.blogspot.com/ (2015): A Historical fort Kharda is the main tourist attraction in Ahmednagar.

**5.** अशोक मारुती बांगर(२०१४): 'मराठ्यांची शेवटची विजयी शौर्यगाथा: खर्डा लढाई', उत्कर्ष प्रकाशन, पुणे—४

**6. Varun Kumar**(2018):Battle of Kharda: Last Victory of the Maratha Confedaracy on Nizam of Hyderabad, Hindi Article, Roar media,

**7.** दैनिक लोकमत:https://www.lokmat.com /ahmadnagar/kharda-fort-223-years-fighting-marathas-victory-victory/(११ मार्च, २०१८)


❑❑❑



Scanned by CamScanner